MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक - दिपक थोरात

नेकनुर / प्रतिनिधी
रामयणातून सर्व नाते कशे असतात हे दिसले, नामस्मरणात किती ताकद असते हे ज्ञानेश्वर माऊली महाराजांनी दाखवून दिले आहे असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या २४ व्या पुण्यतिथीनिमित्त आयोजीत करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात रामायणाचार्य समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून राम कथा सुरू आहे. या कथेला सोमवार दि.१७ रोजी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहुन कथेचे श्रवण केले आणि माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी पुढे बोलतांना ह भ प समाधान महाराज म्हणाले की, ज्या घरात आई-वडिल सतत हसलेले दिसतात या घरासारखे स्वर्ग दुसरे नाही.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२६५ | मंगळवार दि.१८ जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -265 | TUESDAY DT. 18 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

महाराष्ट्र विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक १२ जुलै रोजी

अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी होणार मतदान

मुंबई /प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेच्या ११ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक १२ जुलै रोजी राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी होणार आहे. विधानसभा निवडणुकीच्या अवघ्या काही महिन्यांपूर्वी म्हणजे २७ जुलै रोजी निवृत्त होणाऱ्या ११ आमदारांपैकी चार भाजपचे, दोन काँग्रेसचे तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना, उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शेतकरी आणि कामगार पक्ष आणि राष्ट्रीय समाज पक्षाकडे प्रत्येकी एक जागा आहे.

जयंत पाटील, महादेव जानकर यांचा कार्यकाळ पूर्ण

कार्यकाळ पूर्ण होत असलेल्या विधान परिषदेच्या आमदारांमध्ये डॉ. मनिषा श्यामसुंदर कायंदे, विजय विठ्ठल गिरकर, अब्दुल्ला खान ए. लतीफ खान दुर्रानी, निलय मधुकर नाईक, ड. अनिल दत्तात्रय परब, रमेश नारायण पाटील, रामराव बाळाजीराव पाटील, डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा, डॉ. प्रज्ञा राजीव सातव, महादेव जगन्नाथ जानकर, जयंत प्रभाकर पाटील यांचा समावेश आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीत भाजपच्या खराब कामगिरीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राजीनामा देण्यावर ठाम असल्याचे दिसत असल्याने, महाराष्ट्रातील पक्षाचे नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत दिल्लीत बैठक घेणार आहेत. कोअर कमिटीच्या या बैठकीमध्ये २०२४ च्या विधानसभा निवडणुकांसाठी देखील रणनिती ठरणार आहे.

महाराष्ट्रातील भाजपच्या निवडक नेत्यांची बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी मंगळवारी दिल्लीत बोलविली आहे. कोअर कमिटीच्या या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, रावसाहेब दानवे, सुधीर मुनगंटीवार, पंकजा मुंडे आदी नेते उपस्थित राहणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा देत पक्ष संघटनेमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यांच्या या राजीमान्यावर देखील आजच्या बैठकीत निर्णय होणार आहे.

अशी असेल प्रक्रिया

अधिसूचना जारी - २५ जून २०२४
नामांकन दाखल करण्याची शेवटची तारीख - ०२ जुलै, २०२४
नामनिर्देशनपत्रांची छाननी - ०३ जुलै, २०२४
उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख - ०५ जुलै, २०२४
मतदानाची तारीख - १२ जुलै २०२४ सकाळी ०९:०० ते दुपारी ०४:००
मतांची मोजणी - १२ जुलै २०२४ (शुक्रवार) संध्याकाळी ०५:०० वाजता
निवडणूक पूर्ण होण्याची तारीख - १६ जुलै २०२४

पंतप्रधान यांच्या हस्ते प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेमध्ये १७ व्या हप्त्याचे आज वितरण

राज्यातील ९०.४८ लाख लाभार्थींना रक्कम रू. १८४५.१७ कोटी वितरीत होणार -कृषी मंत्री धनंजय मुंडे

मुंबई /प्रतिनिधी

देशातील शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधान मंत्री किसान सन्मान निधी योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबीयास रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात रू. ६०००/- प्रती वर्षी लाभ दिला जातो. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार प्रतिवर्षी खालील वेळापत्रकानुसार पात्र शेतकरी कुटुंबाच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट लाभ हस्तांतरण द्वारे (उहढ) निधी जमा करण्यात येत आहे.

पहिला हप्ता माहे डिसेंबर ते मार्च रु २०००, दुसरा हप्ता माहे एप्रिल ते जुलै रु.२०००, तिसरा हप्तामाहे ऑगस्ट ते नोव्हेंबर रु.२०००,महाराष्ट्र राज्यात पी.एम.किसान योजनेच्या एकूण १६ हप्त्यांमध्ये राज्यातील शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर एकुण रु २९६३०.२४ कोटी रक्कम जमा करण्यात आलेली आहे.

पी.एम.किसान योजनेचा १७ वा हप्तामाहे एप्रिल २०२४ ते जुलै २०२४ या कालावधीतील १७ व्या हप्त्याचे वितरण दि. १८ जून, २०२४ रोजी मा.पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते वाराणसी, उत्तर प्रदेश येथून वितरीत होणार आहे. देशातील एकूण ९.२० कोटी शेतकऱ्यांना सुमारे २० हजार कोटी रक्कम वितरीत करण्यात येणार असून त्यामध्ये राज्यातील एकूण ९०.४८ लाख लाभार्थींना रक्कम रू.

१८४५.१७ कोटी वितरीत होणार आहेत, खरीप हंगाम मध्ये शेतकऱ्यांना पिकाचे सुधारित बियाणे, खते घेणे, पेरणी करणे इत्यादी शेती कामासाठी या निधीचा निश्चित चांगला उपयोग होणार आहे .

वंचितांच्या लढ्यासाठी मी सोबत ; सरकारने हे उपोषण सन्मानाने सोडवावं

पंकजाताई मुंडे वडीगोद्रीत ; प्रा. लक्ष्मण हाकेंच्या उपोषणाला दिली भेट

जालना ख प्रतिनिधी

भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी आज संध्याकाळी वडीगोद्री येथे ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची उपोषण स्थळी जावून भेट घेतली. उपोषणाचा आजचा पाचवा दिवस होता. दरम्यान वंचितांच्या लढ्यात मी या दोघांसोबत आहे. सरकारने सन्मानाने त्यांचे उपोषण सोडवून न्याय द्यावा अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसीला धक्का लागणार नाही याची लेखी हमी सरकारने द्यावी या मागणीसाठी गेल्या चार दिवसांपासून लक्ष्मण हाके व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपोषण सुरू केले आहे. आज संध्याकाळी पंकजाताईंनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला.यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, दोन दिवस झाले मी अत्यंत विचित्र तीव्र दुःखी भावनांना सामोरे गेले आहे. मला भेटल्या भेटल्या लक्ष्मण दादा रडायला लागले. ताई, तुमच्या पराभवामुळे चार लोकांनी आत्महत्या केल्या, मला बघून रडू येतंय. परिस्थिती हाताळत असल्याने याला कोणतंही राजकीय वळण लागू नये. इथे मी यासाठी आले आहे की फक्त वंचित लोकांसाठी लढणाऱ्या माझ्या

भावांकडे जाऊन त्यांचं म्हणणं काय आहे ते ऐकते आणि ते सरकारसमोर मांडण्याचा शब्द देते. धनंजय भाऊ कृषी मंत्री आहेत, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहे. त्यामुळे सरकारला तिथे जाऊन सांगण्याची गरज नाही. सरकारच इथे आहे, मी त्यांना इथंच सांगते.

माझी मागणी सर्वात महत्त्वाची आहे. आज माझं म्हणणं सर्वांनी ऐकावं अशी विनंती आहे. आंदोलन देशात कुणीही करु शकतं. लोकशाहीत आंदोलन करण्याचा अधिकार आहे.

सरकारने या दोघांचंही उपोषण सन्मानाने सोडवावं

लक्ष्मण हाके यांनी आज पाणी सोडलं आहे. पण त्यांचे चेहरे टवटवीत आहे, कारण संघर्ष त्यांच्या पाचवीला पुजलेला आहे. डोंगर, कपाऱ्यात जाऊन जीवन जगणारा हा माझा वंचित समाज आहे. या समाजाचा काय आवाज आहे, तो आवाज सरकारने ऐकायलाच पाहिजे, अशी माझी मागणी आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना माझी विनंती आहे, ओबीसींच्या आरक्षणाला कसा धक्का लागणार नाही ते आम्हाला समजावून सांगा. मराठा आरक्षणाला आमचा विरोध असण्याचं कारणच नाही. पण चुकीच्या पद्धतीने सर्टिफिकेट दिले जात असतील तर ते मान्य नाही. सरकारने या दोन्ही जणांचे उपोषण सोडवण्यासाठी यावं. ज्याप्रकारे इतरांचं उपोषण सोडवलं जातं त्याच प्रमाणे सन्मानाने यांचं उपोषण सोडवलं जावं, असं आवाहनही पंकजाताई मुंडेंनी केलं आहे.

गेवराई शहरातील मोकाट कुत्र्यांच्या लसीकरण दरम्यान एका पाळीव कुत्र्याचा मृत्यू

लसीकरणाने मृत्यू नसून, त्याला जबर मारहाण करून जीवे मारले आहे; तक्रारदाराचा आरोप

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शहरातील मोकाट कुत्र्यांच्या लसीकरणाची मोहीमाचे आदेशित राधा कृष्ण बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गेवराई यांना करण्यात आले होते. त्या अनुषंगाने शहरातील मोकाट कुत्र्यांचे लसीकरण मोहीम दरम्यान एका पाळीव कुत्र्याचा मृत्यू झाला आहे. लसीकरण दरम्यान मृत्यू नसून त्याला जबर मारहाण करून नियोजित कट रचून जीवे मारले असल्याचे संतापलेल्या तक्रारदारांनी आरोप केला आहे. याप्रकरणी चौकशी करून अद्याप कोणतीही कारवाई केली नाही. कारवाई करण्यासाठी पोलिसांकडून टाळाटाळ होत आहे. सदरील या प्रकरणाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने सर्वत्र स्तरावरून हळहळ व्यक्त केली जात आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार सौ. मीना रमाकांत येवले (रा.रंगार चौक, गेवराई) यांचा पाळीव कुत्रा या संबंधित संस्थेने दि.३० मे २०२४ रोजी लसीकरणासाठी ताब्यात घेतला होता. परंतु त्याचा लसीकरण दरम्यान मृत्यू झाला आहे. तर लसीकरण दरम्यान मृत्यू नसून त्याला तोंडावर , अंगावर असे मारहाण करून त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला असल्याचे सांगितले जात आहे. मग हा मृत्यू नेमका कशाने झाला यांची चौकशी झालेली नसून, गुन्हा दाखल करण्यास संबंधित गेवराई पोलीस टाळाटाळ करीत

पंधरा दिवस उलटूनही अद्याप गुन्हा दाखल नाही

गेवराई पोलिसांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ

आहेत. याप्रकरणी नगर परिषद गेवराई यांनी याप्रकरणाची सखोल चौकशी करून पाळीव कुत्र्याच्या मृत्यूचे कारण व खुलासा तात्काळ मिळावा आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करण्याचे पत्र गेवराई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार बांगर यांना दिले आहेत. परंतु यावर गेवराई पोलिसांकडून कुठली कारवाई करण्यात आली नाही. तक्रारदार मीना येवले यांनी वारंवार पोलीस ठाण्यात चकरा मारल्या परंतु त्यांना संबंधित पोलिसांकडून उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. या कुत्र्याचं शॉम्पल छत्रपती संभाजीनगरला पाठवायचे आहे. तो रिपोर्ट येईल, मग त्यानंतर कारवाई केली जाईल, त्यानंतर काही दिवसांनी पोलिसांना याबाबत माहिती विचारली असता, आम्ही शॉम्पल पाठवलं होतं. परंतु याप्रकरणी गुन्हा दाखल नसल्याने परत पाठवण्यात आले आहे. मग ताबडतोब गुन्हा दाखल का केला नाही. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यासाठी जाणीवपूर्वक याकडे पोलीस दुर्लक्ष करून टाळाटाळ करीत असल्याचे तक्रारदार येवले यांनी बोलताना सांगितले आहे. तसेच याप्रकरणाची सखोल चौकशी करून पाळीव कुत्र्याचा मारहाण करून जीव घेणाऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा

भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या पदाधिकारी निवडी जाहीर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : सातारच्या विश्वास मोहिते यांची तिसऱ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध निवड, उपाध्यक्षपदाची नगरचे दीपक मोहिते आणि रत्नागिरीचे असलम शेख यांचेवर जबाबदारी कराड - महाराष्ट्र राज्य बरोबर इतर काही राज्यात सक्रिय असलेल्या भारतीय ग्रामीण वार्ताहर परिषद या पत्रकार संघटनेच्या पदाधिकारी निवडी नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या बैठकीमध्ये करण्यात आल्या. संघटनेचे तिसरे अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथे नुकतेच पार पडली. अधिवेशन दरम्यान नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. यावेळी सातारा जिल्ह्यातील निर्भीड पत्रकार तिरंगा रक्षक चे संपादक विश्वास मोहिते यांची तिसऱ्यांदा अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी लोकस्तंभ चे संपादक दीपक मोहिते आणि रत्नागिरी येथील जयश्री पत्रकार असलम शेख यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी सरचिटणीस पदी ऍडव्हान्स खबर चे संपादक एडवोकेट अंश खलीपे तर कार्याध्यक्षपदी आधुनिक राजस्थानचे पश्चिम महाराष्ट्राचे प्रतिनिधी संपतराव जाधव यांची निवड करण्यात आली. ही बैठक ज्येष्ठ पत्रकार आणि लोकस्तंभ चे संपादक दीपक मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

नुकत्याच झालेल्या बैठकीत सदस्य म्हणून पुढील निवडी करण्यात आल्या. पोपटराव भिसे सातारा, दिलीप महाजन सातारा, दिनेश झाडे चंद्रपूर, बाबासाहेब कांबळे शिराळा, श्रीधर सोनुले चंद्रपूर, अण्णा वाघमारे पंढरपूर, प्रशांत माळवदे पंढरपूर, शिवसने जळगाव, अमित वालदे गोंदिया, परशुराम भगळे अक्कलकोट सोलापूर , प्रमोद जाधव बुलढाणा, मनीष खर्चे अकोला, मनोहर कांबळे हिंगोली, संपतराव मोहिते सातारा, किरण औटी छत्रपती संभाजीनगर आदींच्या निवडी करण्यात आल्या.यावेळी मावळते उपाध्यक्ष यांचा बुके देऊन सत्कार करण्यात आला. निवडीनंतर पत्रकारांशी बोलताना विश्वास मोहिते म्हणाले, संघटनांमध्ये पदाधिकाऱ्यांनी- सभासदांनी दाखवलेल्या विश्वासाला पात्र होऊन काम करेन. पत्रकारांना सुविधा देताना असणाऱ्या जाचक अटी याबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांशी भेट घेऊन पत्रकारांच्या समस्या मांडणार आहे त्याचबरोबर पत्रकारांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात सदैव सर्व पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने नव्याने लढा उभारणार आहे. स्वागत आणि प्रास्ताविक संपतराव मोहिते यांनी केले. आभार अमित वालदे यांनी मानले.

आ.गोपीचंद पडळकर आ.राम शिंदे आ.महादेव जानकर आ.दत्ता मामा भरणे यांना मंत्री करावे

बीड / प्रतिनिधी

शिंदे -फडवणीस महाराष्ट्र राज्य सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे यामध्ये धनगर समाजाच्या आमदारांना मंत्री करा अशी मागणी धनगर समाज संघटनेचे अध्यक्ष प्रकाश भैय्या सोनसळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. धनगर समाज हा संख्येच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये दोन नंबरला आहे या समाजाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी या समाजाचा महाराष्ट्रामध्ये एकही कॅबिनेट मंत्री नाही धनगर समाजाचा एकही राज्यमंत्री नाही. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप सरकार पुन्हा या महाराष्ट्रामध्ये आणण्यासाठी धनगर समाजाचा महाराष्ट्रामध्ये मोठा वाटा आहे या वाट्यानुसार धनगराच्या वाट्याला एकही मंत्रीपद नाही हे दुर्दैव आहे. धनगर समाज हा भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहतो. धनगर समाजाला या मंत्रिमंडळ विस्तारामध्ये आमदार राम शिंदे , आ.गोपीचंद पडळकर ,आ. दत्तामामा भरणे, आ. महादेव जानकर यांना भाजप सरकारने मंत्रिमंडळामध्ये स्थान द्यावे. शिंदे-फडणवीस सरकारने मंत्रिमंडळामध्ये धनगर समाजाला स्थान दिले नाही तर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये हा समाज नक्कीच या राज्य सरकारच्या विरोधात गेल्याशिवाय राहणार नाही याची दखल या राज्य सरकारने घ्यावी. आ.पडळकर ,राम शिंदे,आ दत्ता मामा भरणे,आ.जानकर यांना शिंदे -फडवणीस सरकारने मंत्री करावे अशी मागणी शिंदे-फडणवीस सरकारकडे करणार आहे असे धनगर समाज संघटनेचे अध्यक्ष प्रकाश भैया सोनसळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे



शाळेच्या प्रवेशद्वारावर शिक्षकाकडून विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत!

सजवलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांचे आगमन !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

उन्हाळ्याची सुट्टी संपुन शनिवारी शाळेच्या पहिल्या दिवशी समाज कल्याण विभागाच्या शासकिय निवासी(मुलांची) शाळेत सजवलेल्या बैलगाडीतून आगमन होताच शाळेच्या प्रवेशद्वारावर पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले तर नवे कोरे पुस्तक हाती देऊन विद्यार्जनाचा प्रारंभ केला .

परिक्षा संपल्या आणि निकाल हाती घेऊन विद्यार्थी सुट्टीचा आनंद उपभोगण्यासाठी गावाकडे गेले ,या कालावधीत काहिनी मामाच्या गावी तर काहिनी माऊशिचे गाव गाठले .नातेवाईकात रममान होता होता सुट्या कधी संपल्या हे कळून आलेच नाही . शनिवारपासून नवीन वर्षासाठी शाळेचे दालन खुले झाले आणि पांगलेले चिमणी पाखरं परत आपल्या घरट्याकडे वळले .

निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका अस्मिता जावळे व सर्व शिक्षक वृंद मुलांच्या स्वागताला सज्ज होते ,प्रवेश द्वारावरून सजवलेल्या बैलगाडीतून मुलांना प्रवेशद्वरावर आणल्यानंतर त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शिक्षकांचे प्रेम पाहून शाळा आपली आणि आपण शाळेचे ही भावना रूजवली गेली .

तालुक्यात प्रत्येक शाळेवर आपापल्या संकल्पनेप्रमाणे मुलांचे स्वागत केले गेले असल्याचे गटशिक्षणाधिकारी जमीर शेख यांनी सांगितले.शाळेत नियमीत उपस्थिती व शालेय अभ्यासक्रम आणि उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग ठेवण्याचे आवाहन त्यांनी केले .

संघर्षयोद्धा मनोज जरांगे चित्रपटाला गेवराईत उत्स्फूर्त प्रतिसाद

स्थानिक कलावंत सहभागाने अधिक उत्साह

गेवराई / प्रतिनिधी

बहुचर्चित व्यक्तिमत्व मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित असलेला संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हा चित्रपट महाराष्ट्रभर १४ जून रोजी प्रदर्शित झाला आहे. सोनई फिल्म क्रिएशनच्या या चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलतडे,असून दिग्दर्शक शिवाजी दोलतडे आहेत. यातील मनोज जरांगे पाटील यांची भूमिका रोहन पाटील यांनी साकारलीअसून या चित्रपटाच्या पटकथा व संवाद लेखनाची जबाबदारी गेवराईचे भूमिपुत्र असलेले डॉ . सुधीर निकम यांनी निभावली आहे. गेल्या दोन वर्षापासून मराठा आरक्षण या विषयावर आपला विचार प्रभावीपणे महाराष्ट्रभर मांडून एक वादळ उभे करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची चित्रपटांमध्ये बायोपिक पद्धतीने मांडणी करणे, हे शिवधनुष्य सोनाई फिल्म क्रिएशनने यशस्वीपणे उचलले आहे.

हे करताना त्यांनी ज्या अंतरवाली सराटी गावामध्ये या सर्व हालचाली होत आहेत त्याच भागातील लाईव्ह लोकेशन चा वापर करून त्या चित्रपटांमध्ये अधिक जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. यालाच जोड म्हणून गेवराई-आंतरवाली सराटी व - मनोज जरांगे पाटील यांचे एक नाते तयार झालेले असल्यामुळे याच भागातील कलावंतांच्या सहभागानेदेखील हा चित्रपट चर्चेचा विषय बनला आहे.

गेवराई येथील प्रसिद्ध नाटककार ड . सुभाष निकम,पटकथा व संवादलेखक डॉ . सुधीर निकम, चित्रपट अभिनेते प्रशांत रुईकर, बीडच्या अनुराधा प्रकाश,यांच्या अनुभवी अभिनयाची जाणीव असणाऱ्या कलावंतांचे मध्यवर्ती सीन असल्यामुळे,या भूमिका प्रेक्षकांची दाद मिळवून जात आहेत आहेत. या सर्व भूमिका गेवराईकरांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले असून मनोज जरांगे पाटील यांच्यावरील प्रेम व यात स्थानिक कलावंतांचा सहभाग असा दुग्धशर्करा योग यामध्ये दिसून येतो आहे.

या सोबतच दीपक गिरी, शिवकुमार सोनवणे,संतोष कसबे, डॉ . मुरलीधर मोटे, डॉ .रचना मोटे, चंद्रकांत सरोदे आदींचा देखील यामध्ये सहभाग आहे.गेवराई व परिसरातील जास्तीत जास्त प्रेक्षकांनी या चित्रपटाचा आस्वाद घ्यावा ,असे आवाहन सोनई फिल्म क्रिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

नागपूरचाळ येरवडा पुणे भागात ३० ते ४० जणांच्या विशेष समुदायाच्या जमावाने एका हिंदू कुटुंबाला जीवे मारण्याचा प्रयत्न केला आणि परिसरातील इतर महिलांना आणि नागरिकांना सुद्धा शिवीगाळ आणि मारहाण केली.

सायंकाळी ६ च्या सुमारास ३० जणांचा विशेष समुदायाच्या मुलांचा जमाव भागातील प्रत्येक रस्त्यावर सुमारे ३० बोकडं घेऊन त्यांची शर्यत(रेसिंग) लावत होता. रस्त्यावर भागातील इतर लहान मुलं मुली सुद्धा खेळत होते. त्यामुळे त्यांना रवी विश्वकर्मा(त्यांची मुलगी तिकडे खेळत होती) यांनी हटकले व विचारले कि अश्याप्रकारे रेसिंग लावल्यास लहान मुलांना मोठी इजा/दुखापत होऊ शकते. त्यावर सुफियान सय्यद याने लगेचच उलट बोलून मारायला सुरुवात केली त्यानंतर लगेचच त्या पूर्ण जमावाने रवी विश्वकर्मा, भारत विश्वकर्मा यांच्यावर हल्ला केला; त्यांना सोडवायला जात असतांना दिनेश विश्वकर्मा, सुखराम विश्वकर्मा(त्यांचे वडील वय- ६७ वर्ष) आणि शोभा विश्वकर्मा (वय ६० वर्ष) (त्यांची आई) यांच्यावर

सुद्धा हल्ला केला. लोखंडी रॉड, दगडं, विटा, सायकली दिसेल त्या गोष्टीचा हत्यार म्हणून वापर केला आणि त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. जेव्हा उपस्थित इतर महिलांनी व नागरिकांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यांना सुद्धा मारहाण आणि शिवीगाळ केली. यामध्ये सर्वांना जबर मुक्कामार लागला आणि शोभा विश्वकर्मा या वृद्ध महिलेला लोखंडी रॉड ने मारत जीवे मारण्याचा प्रयत्न केला गेला. त्यामध्ये त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली त्याचाच हा फोटो.

विशेष समुदायाच्या महिलांनी सुद्धा त्यांच्या कुटुंबाच्या इतर महिलांवर हल्ला केला.विशेष समुदायाच्या एका मुलाने जास्तीत जास्त जमाव गोळा व्हावा म्हणून पळत पळत इतर मुलांनाही बोलवून घेतले. विशेष समुदाय जमाव गोळा करताना आज यांना मारून टाकायचे कापून टाकायचे अश्या मोठ-मोठ्याने घोषणा देत एकत्र येत होता अश्या घोषणा परिसरातील अनेक नागरिकांनी ऐकल्या. सुफियान सय्यद ज्याने मारहाणीला सुरवात केली तो एक शाळकरी मुलगा आहे आणि गेल्या काही महिन्यांपूर्वीच त्याने शाळेमध्ये एका हिंदू मुलाला अल्लाहू अकबर बोलण्यास जबरदस्ती केली होती आणि त्याला मारहाण सुद्धा केली होती. शाळेमध्ये सुद्धा त्यांनी दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला. सय्यद कुटुंबीयांचा घरातच मटक्याचा धंदा आहे त्यामुळे त्यांना काही राजकारणी आणि काही प्रशासनातील लोकांकडून सवलत तर मिळणार नाही ना असाही संशय व्यक्त करण्यात येतोय.सर्वात महत्वाचे म्हणजे यापैकी कोणत्याही मुलांसोबत कुटुंबातील कोणाचाही कधीही कोणत्याच कारणावरून वाद सुद्धा नव्हता किंवा कोणतीही पार्श्वभूमी सुद्धा नव्हती; तरीही अश्याप्रकारे जमाव गोळा करून जीवे मारण्याचा प्रयत्न करत असेल तर त्यावर काय व्हायला हवे?

आनंदाचे सिध्दांत समजून घेण्याची पुन्हा एकदा संधी !

कल्याणकारी ज्ञानेश्वरी ग्रंथातील न उलगडणारे अर्थ सोप्या भाषेत सांगतात न्यायाचार्य !

शिरूर कासार (प्रशांत बाफना)

मानवी जिवनातील न उलगडारे कोडे आणि संसारातील कर्म प्राधान्य हे भगवान कृष्णानी गितेच्या माध्यमातून अर्जूनाला कुरूक्षेत्रावर दिलेले ज्ञान आजही मनुष्याला तितकेच महत्वपुर्ण असुन संस्कृत भाषेतील हे ज्ञान प्राकृत भाषेत विश्वमाऊली ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी ग्रंथात सांगत असतांना या ग्रंथातील आनंदाचे सिध्दांत सोप्या भाषेत उलगडून सांगण्याचे काम श्रीक्षेत्र भगवान गडाचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री हे करत असल्याने घराघरात ज्ञानेश्वरी दिसू लागली नुकत्याच पार पडलेल्या घोगसपारगांव येथील ९० व्या नारळी सप्ताहात सात दिवस ही पर्वणी लाखावर भाविकांनी अनुभवली असे असले तरी सर्वांना हा लाभ घेता आला नसल्याने पुन्हा एकदा झी टॉकीज च्या माध्यमातून ते प्रसारण पुन:श्च सुरू केले आहे ,या आनंदाच्या सिध्दांत श्रवणाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन भगवानगड ट्रस्टने केले आहे .

अनेक वेळा माणूस हा संसारात त्रासुन जातो आणि अशा वेळी यातून सावण्यासाठी प्रभावी साधन हे ज्ञानेश्वरी ग्रंथ आहे ,मात्र आपल्याला त्यातील माऊलीचे शब्द अनाकलनीय वाटतात आणि मग अर्थ न उलगडल्याने आनंद घेता येत नाही अशा द्विधा मन:स्थितीत सर्वसामान्यांना हा अर्थावबोध करून देण्याचे अवघड काम अगदी सोप्या भाषेत मानसाच्या हृदयात घर करून राहतील अशा शब्दात आनंदाचे सिध्दांत महंत शास्त्रीजी सांगतात ,आणि मग सहजच ग्रंथाबद्दल जिव्हाळा तयार होतो आणि संसारातील दु:खावर हलकिशी फुंकर घातली जाते .कर्म करत असतांना देखील पारमार्थिक कल्याणकारी हे सिध्दांत पुनश्च ऐकण्याची संधी उपलब्ध झी टाकीजने उपलब्ध करून दिली आहे .सोळा ते बावीस जून पर्यंत सकाळी हे निरूपण श्रवणाचा योग या माध्यमातून आलेला आहे सर्व ज्ञानेश भक्तांनी तसेच

भांबावलेल्या मानसांनी आवर्जून आनंदाचे सिध्दांत श्रवण करून आपला आनंद द्विगुणित करावा असे आवाहन भगवानगड ट्रस्टने केले आहे.

मनसे चे माजी शहर सचिव तुषार दोडके यांचा जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या गटात जाहीर प्रवेश

बीड / प्रतिनिधी

मनसेचे बीड शहर सचिव तुषार दोडके यांनी माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन आज जाहिर प्रवेश केला यावेळी तुषार दोडके यांच्या घरी सदिछ्या भेट दिली वार्ड क्र २२ मधील पंजशील नगर नवीन सरस्वती शाळा जुना धानोरा रोड याठिकाणी प्रवेशाचा कार्यक्रम झाला यावेळी सर्व समाज बांधव मित्र परिवार उपस्तित होते

यावेळी माजीमंत्री क्षीरसागर यांनी वार्डातील समस्या जाणुन घेतल्या व लवकरच येणार्या काळात सर्व मागण्या पुर्ण करू आसे आश्वासन दिले यावेळी

यावेळी विक्रम बिडवे, संतोष बिडवे, सचिन बोबडे, प्रा.सनि वाघमारे ,मनोजनाना मस्के.भगवान वाघमारे,प्रमोद राऊत,दत्ता बिडवे

,किशोर शिंदे, महेश वखरे, प्रकाश राऊत ,अविनाश शिंदे, अविनाश वडमारे, संतोष बिडवे ,आप्पा शिरसाट ,ओमकार मस्के ,पंकज धनवे ,सागर धनवे ,शुभम धनवे, संतोष ससाणे, प्रफुल गायकवाड, शिवलाल घाडगे, किशोर गायकवाड, सूर्या तावरे, उत्कर्ष कदम,आदी मित्रपरिवार उपस्थित होता.

पतंजली योग समितीच्या वतीने बीड शहरात योगासन स्पर्धा संपन्न

बीड/प्रतिनिधी

बीड शहरातील सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड येथे दहाव्या जागतिक योग दिनाच्या निमित्ताने योगासन स्पर्धा संपन्न झाली. माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर , डॉ.अरुण भस्मे सर व ड.श्रीराम लाखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थी व नागरिकांमध्ये योगासनांची आवड निर्माण होण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

काकू नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने ही योगासन स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन काकु नाना प्रतिष्ठानचे अध्यक्ष ड .कालिदास नाना थिगळे, केंद्रीय होमिओपॅथिक

परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. अरुण भस्मे सर व पतंजली योग समिती बीडचे सर्वेसर्वा ड.श्रीराम लाखे पाटिल,महिला पतंजली योग समितीच्या राज्य कार्यकारणी सदस्य सौ .अनुपमा ताई कोरे ,बीड जिल्हा योग असोसिएशन चे अध्यक्ष विनायकराव वझे,महाराष्ट्र योगासन स्पोर्ट असोसिएशनचे सचिव डॉ. अंबादास फटांगरे, स्पर्धा संयोजक हेमाताई विभुते यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

मुले व मुलींच्या एकूण चार गटात ही स्पर्धा संपन्न झाली. बीड जिल्ह्यातील बीड शहर ,परळी,अंबाजोगाई ,केज, धारूर ,आष्टी येथील स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. अत्यंत चुरशीच्या पद्धतीने बीड शहरात पहिल्यांदाच ही स्पर्धा संपन्न झाली . स्पर्धा नंतर लगेच निकाल जाहीर करण्यात आला.स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना २१ जून २०२४ रोजी आशीर्वाद लॉन्स बीड येथे सकाळी सहा वाजता होणाऱ्या दहाव्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमात प्रमाणपत्र ,मेडल व ट्रॉफी देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धा पंच म्हणून विकास गवते, प्रा.अंबादास फटांगरे ,प्रवीणा पोकळे,प्रा.माधव काळकुटे ,अविनाश इगडे ,राधिका वझे ,संतोष पडोळे सुरेखा सरोदे यांनी काम पाहिले. स्पर्धा आयोजन करण्यासाठी पतंजली योग समितीचे जिल्हा प्रभारी नितीन गोपण, विकास गवते, हेमा विभुते,रत्नाकर कुलकर्णी, पुरुषोत्तम एरंडे, आर वी. वजुरकर, विलास घोडके, राजेंद्र गाडेकर, चंद्रकांत माने, बाबासाहेब कुडके, रामचंद्र ठोसर यांचे सहकार्य लाभले

राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन, तेलबिया उत्पादन वाढीसाठी करा ऑनलाईन अर्ज !

शिरुरकासार(प्रशांत बाफना)

तालुका कृषी विभागच्या वतीने तेलबिया उत्पादन वाढीसाठी मूल्यसाखळी विकास योजने अंतर्गत महा डिबीटी पोर्टलवर अर्ज करून शेतकऱ्यांनी विविध खतांची मागणी करून आपले कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादन वाढीसाठी लाभ घ्यावा असे आवाहन कृषी अधिकारी राजेंद्र नेटके यांनी केले आहे.

महा डिबीटीवर विविध नॅनो युरियानॅनो डीएपी, मेटाल्डीहाईड असे विविध खते कृषी विभागा मार्फत थेट शेतकऱ्यांना देऊन तेलबिया उत्पादकता वाढीसाठी राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस, सोयाबीन अश्या विविध तेलबिया उत्पादन वाढीसाठी मूल्य साखळी विकास योजने अंतर्गत हा उपक्रम कृषी विभागाने राबवला असून तालुक्यातील शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून आपली मागणी करावी असे आवाहन कृषी विभागामार्फत कृषी अधिकारी राजेंद्र नेटके साहेब यांनी केले आहे.

तालुका कृषी कार्यालयाकडून शेतक-यांना आवाहन !

मुलींना मोफत शिक्षणाच्या घोषणाची सरकारने तात्काळ अंमलबजावणी करावी -राजेश काटे

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार

शिरूर कासार /प्रतिनिधी

राज्य सरकारने मुलींना सरसकट मोफत शिक्षण देण्याची घोषणा सरकारने केली होती परंतु सध्या या जून महिन्यामध्ये राज्यभरात मुलींच्या शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया चालू असून या प्रक्रियेमध्ये मुलींना प्रवेश प्रक्रियेसाठी शाळा कॉलेजची फी भरावी लागत आहे त्यामुळे पालक संतप्त झाले असून सरकारने केवळ ही घोषणाच केली काय. पालक शाळा, विद्यालय प्रवेश प्रक्रियेसाठी जात असताना त्यांना हा सर्व प्रकार दिसून येत आहे अनेक

ठिकाणी शाळा कॉलेज व्यवस्थापनाने आम्हाला अद्याप पर्यंत शासनाचा कुठलाही अधिकृत जीआर किंवा आदेश प्राप्त झाला नसल्याचे सांगत आहेत यामध्ये मात्र पालकांची मोठी हेळसांड होत आहे . सरकारने केलेल्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी करावी जेणेकरून सध्या राज्यभरात शैक्षणिक प्रक्रिया चालू असून या प्रक्रियेत मुलींना फायदा होऊ शकतो नसता ही घोषणा केवळ हवेत तर नाही ना हा सवाल पालक वर्ग करीत आहेत यामुळे सरकार विषय नाराजी आणखीन वाढत आहे. यासाठी सरकारने प्रवेश प्रक्रियाची तारीख वाढुन देऊन लवकर मोफत शिक्षणाची अंमलबजावणी करावी नसता बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार दि. २४ रोजी उपोषणाला बसणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते राजेश भाऊ काटे यांनी निवेदनाद्वारे इशारा दिला आहे.

राज्यात मान्सूनचा वेग मंदावला पाहा कधीपासून होणार सक्रिय

मुंबई ।प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून राज्यात मान्सूनचा वेग मंदावला आहे. राज्यात अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण तसेच उन्हाचा कडाका बसत आहे. मान्सूनचा वेग मंदावल्याने शेतकऱ्यांची चिंता मात्र वाढली आहे. मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या मात्र विदर्भात पुरेसा पाऊस झालेला नाही. दरम्यान, पावसाचा वेग वाढण्यासाठी आणखी दोन ते तीन दिवस लागण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.

राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा येथे पावसाच्या तुरळक सरी कोसळत आहेत. मात्र यांचा जोर तितका नाही. दरम्यान, पावसाची प्रगती मंदावल्याने काही ठिकाणी उन्हाचे पुन्हा चटके बसू लागते. अनेक ठिकाणी तर तापमान वाढून ३५ ते ४० अंशापर्यंत पोहोचले आहे.येत्या तीन ते चार दिवसांत अरबी समुद्रात नैऋत्य मोसमी पावसाच्या शाखा मजबूत होतील आणि त्यानंतर पावसाचा जोर २० जूननंतर वाढेल असा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे.अद्याप उन्हाचे चटके सहन करणारा विदर्भ मात्र पावसाच्या

प्रतीक्षेत आहे. विदर्भात हवा तितका पाऊस झालेला नाही त्यामुळे तेथील लोक पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

प्रलंबित महागाई भत्ता त्वरित लागू करा-मराठवाडा शिक्षक संघ

परळी ।प्रतिनिधी

राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचारी यांचा गेल्या पाच-सहा महिन्या पासून देय आसलेला परंतु आचारसंहितेमुळे प्रलंबित ठेवलेला चार टक्के महागाई भत्ता त्वरित लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाने राज्याचे मुख्यमंत्री व अर्थमंत्री यांच्याकडे केली आहे. याबाबतीत मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बंडू अघाव यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की,केंद्र सरकारने त्यांच्या कर्मचाऱ्यांना चार टक्के वाढिव महागाई भत्ता लागू करून जवळपास पाच महिने होत आहेत. त्यामुळे त्यांचा महागाई भत्ता ४६% वरून ५०% टक्के झाला आहे.मध्येच लोकसभेच्या निवडणुकांची आचारसंहिता आसल्यामुळे तो राज्यशासनास त्यांच्या कर्मचाऱ्यांना लागू करता आला नाही. परंतु आता आचारसंहिता संपली आसून तो प्रलंबित आसलेला चार टक्के महागाई भत्ता राज्यशासनाने राज्यातील शासकीय,

निमशासकीय कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पुर्वलक्षी प्रभावाने त्वरित लागू करावा अशी मागणी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सुर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम,कोषाध्यक्ष ए.बी.औताडे, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे,एस.जी.गुठे,सहसचिव एन.जी.माळी, रेखाताई सोळंके, टी.जी.पवार,केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अशोक मस्कले, बंडू अघाव,जी.जी.रातोळे,मधुकर जोंधळे, आरिफ कुरेशी, प्रेमदास राठोड, फारुख जमादार, एस.एस.तिर्थकर, कौशल्य जी.पी.,पाटोदेकर ए.डी.,दिनेश पाटील, सोळंके एन.टी.,विक्रम कदम,वऱ्हाड बी.ए.यांच्यासह जिल्हाध्यक्ष कालीदास धपाटे, जे.एस.शेरखाने, व्यंकट चिलवरवार, मकरंद यशवंत, कैलास हाळदे,रमेश आंधळे, बसवेश्वर स्वामी, हरिभाऊ भडके,जिल्हासचिव गणेश आजबे,भाई चंद्रकांत चव्हाण, जी.व्ही.माने,संजय यळवंते, रविंद्र वाकोडे, वसंत ढेंगळे आदिनी केली आहे.

महाराष्ट्रात पुन्हा एकदा मोठा राजकीय भूकंप

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठा राजकीय भूकंप येणार आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बडे नेते तथा मंत्री छगन भुजबळ सत्तेतून बाहेर पडणार का अशी चर्चा सुरु झाली आहे. यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ उडाली आहे. मुंबईत झालेल्या बैठकीत पदाधिका-यांनीच तसा सूर बोलून दाखवलाय.

भुजबळ नाराज

छगन भुजबळ यांना लोकसभा तसेच राज्यसभेला डावलल्यामुळे ओबीसींमध्ये नाराजी दिसून येतेय. तसंच सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी होणार असल्यास ओबीसींवर अन्याय होईल असाही सूर बैठकीत दिसून आला. सरकारमध्ये ओबीसींना मिळत असलेल्या सवलतीतही अन्याय होत असल्याची भावना बैठकीत पदाधिकाऱ्यांनी बोलून दाखवली. छगन भुजबळांची राजकीय कोंडी केली जात असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये आहे. त्यामुळे भुजबळांनी निर्णय घेण्याचा आग्रह कार्यकर्त्यांचा आहे.. तेव्हा येत्या काळात छगन भुजबळांचं नाराजी नाट्य घडण्याची शक्यता असल्याची माहिती मिळत आहे. राज्यसभेच्या जागेसाठी सुनेत्रा पवार, पार्थ पवार यांच्यासोबतच राष्ट्रवादी पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ इच्छुक असल्याची चर्चा होती. खरं तर भुजबळांची नाराजी ही आतापासूनची नाही.. तर लोकसभा निवडणुकीपासून भुजबळांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवलीय... नाशिक लोकसभेच्या जागेचा तिढा अखेरपर्यंत रंगला.. भाजप नेतृत्वाने आपल्या नावाला मंजुरी दिल्याचा दावा भुजबळांनी केला होता. मात्र अखेरच्या क्षणी हे तिकीट एकनाथ शिंदेंच्या हेमंत गोडसेंना देण्यात आलं.. भुजबळांच्या अलीकडच्या अनेक हालचालींमुळे महायुतीतला त्यांचा असंतोष वाढल्याची चर्चा आहे.. तेव्हा भुजबळ पुढे काय करणार... त्यांचं पुढचं पाऊल काय असणार

मराठवाड़ा व खांदेश सीमेवरील रस्ता वाहतूक बंदचा आदेशाला केराची टोपली

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर मराठवाडा खान्देश सीमेवर वाघूर नदीवरील पुल जीर्ण झाल्यामुळे जड तसेच हलक्या वाहतुकीसाठी रविवार दि.१६ जून पासून बंद करण्याचे आदेश जळगाव पोलिस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी दिले आहे.मात्र आज दि १७ रोजी याच पुलावरून वाहतूक सुरुच असल्याने हलक्या व जड वाहने नियमांनुसार दिलेल्या मार्गावरून वाहने जात नसल्यामुळे जिल्हा पोलीस अधीक्षक जळगाव व बाधकाम विभागाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत असल्याचे दिसून येत आहे

छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरील वाकोद ता.जामनेर गावाजवळील वाघूर नदीवरील डाव्या बाजूकडील जुना पूल जीर्ण झाल्यामुळे वाहतुकीसाठी धोकादायक झाला असून पुलाची दुरुस्ती होणे गरजेचे असल्याने रविवार

दि.१६ जून पासून पुलाची दुरुस्ती पावेतो सदर महामार्गावरील वाहतूक मार्गामध्ये बदल करणे गरजेचे असल्यामुळे जळगाव पोलिस अधीक्षक डॉ.महेश्वर रेड्डी यांनी आपल्या अधिकाराचा वापर करून वाघूर नदी पुलावरील वाहनांची वाहतूक मार्गात बदल करण्याचे आदेश दिले आहे. दोन दिवस होवून हि जीर्ण झालेल्या पुलावरून वाहने वापरत आहे त्याकडे बाधकाम विभाग व पोलीस प्रशासनाने कोणतेही पाउल उचललेली दिसत नसल्यामुळे प्रवासी व वाहन धारकांन मध्ये द्विधा स्थिती निर्माण झाली आहे जीर्ण झालेल्या पुलावरील रस्त्याची अवस्था बिकट झाली आहे खराब रस्त्यामुळे अपघात झाल्यास कोन जबाबदार असा प्रश्न निर्माण झाला आहे

पर्यायी मार्ग

जड वाहतूक:जळगाव नेरी- एरंडोल-चाळीसगाव- छत्रपती संभाजीनगर. हलकी वाहतूक: फर्दापूर -तोंडपुर-मांडवा- वाकडी-शहापूर-जामनेर ते भुसावळ किंवा नेरी जळगाव दोन वर्षापासून जमीन अधिग्रहण रखडले: वाघूर नदीवरील पुलाच्या रुंदीकरणासाठी लागणाऱ्या जमिनीच्या अधिग्रहणाचा प्रश्न दोन वर्षापासून प्रलंबित आहे.त्यामुळे नवीन पुलाचे काम अर्धवट आहे.

दुरुस्तीला २० दिवस: पुलाच्या दुरुस्तीसाठी वीस दिवसाचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे हा रस्ता महिनाभरात पूर्ववत होईल असे बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे.

पैठण मध्ये महाविकास आघाडीच्या वतीने खासदार डॉ कल्याण काळे साहेब यांचा नागरी सत्कार

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)

पैठण येथे महाविकास आघाडीचे लोकप्रिय खासदार डॉक्टर कल्याण काळे साहेब हे प्रचंड बहुमताने विजयी झाल्याबद्दल महाविकास आघाडीच्या वतीने आशिर्वाद मंगल कार्यालय पैठण येथे दि.१६जून रोजी सायं ५:३० वा. भव्य नागरिक सत्कार आयोजित करण्यात आला होता.यावेळी खासदार

डॉ. कल्याण काळे साहेब यांनी पैठण नगरीतील संत एकनाथ महाराजांचे दर्शन घेऊन त्यानंतर या सत्कार सोहळ्याला उपस्थिती दर्शवली. या सत्कार सोहळ्या प्रसंगी त्यांनी सर्व मतदार बंधूंचे आभार देखील मानले.

याप्रसंगी मा.मंत्री अनिल पटेल साहेब, मा.आमदार घोडके साहेब ,माननीय आमदार संजय वाकचौरे ,श्री दत्ता पाटील गोर्डे, रवींद्र काळे ,विनोद तांबे ,मनोज पेरे ,गुलदाद पठाण, निमेश पटेल ,अजय परळकर, राखीताई परदेशी ,अंजली बांगर, भाऊसाहेब जगताप, राहुल सावंत ,सलीम इनामदार, यासह सर्व महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तिसऱ्यांदा केलेली अटक ठरली वैध

कुटे, पाटोदकरला ५ दिवसांची कोठडी:५ दिवसांपासून रखडलेला तपास होणार सुरू

बीड - ज्ञानराधा पतसंस्थेच्या गैरव्यवहार प्रकरणात पतसंस्थेचे अध्यक्ष सुरेश कुटे व संचालक आशिष पाटोदकर यांची अटक दोन वेळा न्यायालयाने बेकायदेशीर ठरवल्यानंतर तिसऱ्यांदा केलेली अटक बीड न्यायालयात वैध ठरली. न्यायालयाने दोघांनाही पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, यामुळे ५ दिवसांपासून रखडलेला या गुन्ह्याचा तपास आता पुन्हा सुरू होणार आहे.५१ शाखा आणि साडेसहा लाख ठेवीदार असा या पतसंस्थेचा विस्तार आहे. ३ हजार कोटींच्या ठेवी अडकल्या आहेत. ९ महिन्यांपासून ठेवी मिळत नसल्याने ठेवीदार हवालदिल आहेत. पोलिसांनी ७ जून रोजी पुण्यातून सुरेश कुटे आणि संचालक आशिष पाटोदकर यांना माजलगाव ठाण्यात दाखल गुन्ह्यात अटक केली होती.पोलिस कोठडीनंतर त्यांना १३ जून रोजी पुन्हा न्यायालयासमोर हजर केले होते. त्यांनी अटक बेकायदेशीर असल्याचा अर्ज दिला होता. यावर सुनावणी होऊन १५ जून रोजी त्यांची अटक न्यायालयाने बेकायदेशीर ठरवली होती. नंतर बीड शहर ठाण्यात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी त्यांना त्याच दिवशी अटक केली. मात्र, रविवारी बीड न्यायालयानेही त्यांनी दुसरी अटक बेकायदेशीर ठरवली होती. यानंतर शिवाजीनगर ठाण्यातील गुन्ह्यात तिसऱ्यांदा अटक केली होती. सोमवारी दुपारी कुटे, पाटोदकर यांना न्यायालयात हजर केले गेले. पोलिसांनी कुटे यांना तपासासाठी ७ दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली. यावर कुटेंच्या वकिलांनी हाऊस अरेस्टची मागणी केली .

शिरूर शहराचा विकासाचा मार्ग झाला मोकळा !

नगरपंचायच्या विकास आराखड्याला मिळाली मंजुरी ! आ.सुरेश धस यांच्या सातत्यपुर्ण प्रयत्नाला मिळाले यश !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

सन २०१५ ला स्थापन झालेल्या नगरपंचायत शिरूरच्या आ.सुरेश धस यांच्या सातत्यपुर्ण प्रयत्नाला यश मिळाले असुन शहराच्या विकासाचा मार्ग मोकळा झाला असुन सादर केलेल्या विकास आराखड्याला शासनाकडून मंजुरी मिळाली असल्याची माहिती नगरपंचायत सुत्राकडून देण्यात आली .

नगर पंचायत स्थापनेनंतर शहराच्या भविष्यातील विकासाचा दृष्टिकोन समोर ठेवून विकास आराखडा शासनाकडे सादर केला होता त्यानंतर हरकती मागवण्यात आल्या त्यानंतर शासनाने एक कमिटी नेमली कमिटी आणि नगरपंचायतने सुधारित आराखडा तयार करून पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठवण्यात आला यासंबधाने सुधारणा व आराखडा मंजूर करण्यासाठी शासकीय स्तरावर आदरणीय सुरेश आण्णा धस यांनी अथक प्रयत्न केले वेळोवेळी बैठक घेतल्या त्यानंतर

मे २०२१ मध्ये ए आणि बी असे दोन पार्ट करण्यात आले ए पार्टमध्ये १ते १४ आरक्षणे अंशता मंजूर करण्यात आली व उर्वरित १ते १३आरक्षणे इपी मध्ये प्रसिद्ध करण्यात आली त्यावर हरकती व सूचना मागवण्यात आल्या नियमाप्रमाणे त्याचाही परिपूर्ण अहवाल शासनाकडे सादर केला परंतु काही आरक्षणे नियमात न बसल्यामुळे त्या आरक्षणाचा पुन्हा याच्यात समावेश करण्यात आला व मार्च २०२४ रोजी आराखड्याला अंतिम मंजुरी देण्यात आली शिरूर कासार शहराचा विकास आराखडा मंजूर केले बद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्रीअजीत दादा पवार व आ.सुरेश धस यांचे शहर विकास आराखड्यास अंतीम मंजुरी दिल्याबद्दल बद्दल शिरूर कासार नगरपंचायत च्या वतीने अभिनंदन करण्यात आले मंजूर आराखड्याच्या अनुषंगाने काही ठळक उदाहरणे शहराभोवती रिंगरोड , अती गरज असलेले अग्निशमन दलाची गाडीसाठी जागा ,टाऊन हॉल ,कचरा व्यवस्थापन विल्हेवाट ,उद्यान ,खेळाचे मैदान , पार्किंग व्यवस्था ,शॉपिंग कॉम्प्लॅक्स तसेच बेघरांना घरासाठी जागा या गोष्टिचा प्राधान्याने समावेश विकास आराखड्यात आहे . मंजूर विकास आराखड्यात नगरपंचायतने सर्व खाजगी मालकिच्या जमिनीवरील आरक्षण वगळण्याची शिफारस केली होती मात्र काही ठिकाणी नियमावलीत न बसल्याने आरक्षण पडले असून आ.सुरेश धस यांचे मार्गदर्शनाखाली हे पडलेले सर्व आरक्षण देखील कलम ३७ प्रमाणे टप्प्याटप्प्याने वगळण्यात येईल ,याबाबत कुणीही घाबरून जाऊ नये अथवा गैरसमज करून घेऊ नये असे नगर पंचायत चे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील यांनी केले आहे

धारूर येथील शिवस्मारकातील नऊ शिवप्रेमींना तात्काळ सोडा

गुन्हे मागे घ्या – बापूसाहेब साळुंखे

बीड,धारूर । प्रतिनीधी

धारुर येथील शिवस्मारकातील नऊ शिवप्रेमीना तात्काळ सोडा, गुन्हे मागे घ्या अशी मागणी अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापुसाहेब साळुंके यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे केली.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, धारुर येथील शिवस्मारक प्रकरणातील नऊ शिवप्रेमीना अटक केली, त्यांना तात्काळ सुटका करा व गुन्हे मागे घ्या, धारूर येथील शिवस्मारक ३५ वर्षांपासून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज विषय जो अस्तंगत रखडलेल्या होता सर्व मावळे

यांनी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक बसवण्यात आले. तरी या प्रकरणात नऊ शिवप्रेमीना तात्काळ सोडण्यात यावे नाही तर अखिल भारतीय मराठा महासंघाच्या बीड जिल्हावतीने आंदोलन करण्यात येईल, असे अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष बापूसाहेब साळुंके यांनी केले. यावेळी बीड अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष आदिनाथ पिंगळे, विद्यार्थी जिल्हाध्यक्ष

भागवत मस्के, छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के, देविसिंह शिंदे, बीड तालुकाध्यक्ष प्रकाश शिंदे, बीड शहराध्यक्ष दत्ता शेळके आदी पदाधिकारी उपस्थित होते

आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने नगरपालिकेचे उप मुख्याधिकारी साहेब यांना निवेदन देण्यात आले

अमरधाम स्मशानभूमी समोरील पुलावरील संपूर्ण लोखंडाचे साखळे गज उघडे पडले आहेत त्यामुळे अनेक नागरिकांचे अपघात देखील झाल्याच्या घटना वारोवार समोर येत आहेत पुलाची ८ दिवसात तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन नगरपालिका प्रशासनाचे विरोधात उभे करू असा इशारा मनसे शहराध्यक्ष करण लोंढे यांनी दिला आहे यावेळी जिल्हा सचिव सोमेश कदम उपजिल्हाध्यक्ष कुणाल उगले शहर सचिव ओम पालवे शहर उपाध्यक्ष प्रतीक लोळगे शहर चिटणीस यश जगताप व महाराष्ट्र सैनिक उपस्थित

गेवराई येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी ; प्रवेश प्रक्रिया सुरु

दिव्यांग शाळेत मुकबधीर व मतिमंद बालकांचा आजच प्रवेश निश्चित करा

गेवराई / प्रतिनिधी

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिव्यांग कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य अंतर्गत जिल्हा समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद बीड व रेणुकामाता सेवाभावी संस्था महाडुळा संचलित कै.भगवानराव ढोबळे मुकबधिर निवासी विदयालय व मतिमंद निवासी विदयालय गेवराई येथील निवासी शाळेत सन-२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी मुकबधिर व मतिमंद या प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. तरि पालकांनी यांची नोंद घेऊन आपल्या पाल्याचा मोफत प्रवेश निश्चित करावा असे दिव्यांग शाळेच्या वतीने प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

गेवराई येथील कै.भगवानराव ढोबळे मुकबधिर निवासी विदयालय व मतिमंद निवासी विदयालय गेवराई येथे सन-२०२४- २५ या शैक्षणिक वर्षासाठी मोफत प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रवेशासाठी मुकबधिर, मतिमंद या प्रवर्गातील मुलाचे वय ६ ते १४ वर्ष वयोगटातील असावे तसेच

मुलगा मतिमंद व मुकबधिर असावा दिव्यांगत्व असल्याबाबतचे वैद्यकीय अधिकाऱ्याचे ऑनलाइन प्रमाणपत्र असावे वरीलपैकी दिव्यांगत्व असल्यास व त्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र काढले नसल्यास प्रमाणपत्र काढण्यासाठी शाळेकडून मदत केली जाते. प्रवेशीत दिव्यांग विद्यार्थांना वस्तीगृहात अंघोळीसाठी गरम पाणी, सकाळी नाष्टा, दुपारी जेवण, संध्याकाळी जेवण, राहण्यासाठी भव्य इमारत झोपण्यासाठी सुसज्ज हॉल व शिक्षणासाठी वर्गखोल्या व शैक्षणिक साहित्य तसेच वैद्यकिय उपचार इत्यादी सेवा विनामूल्य आहेत. तरि आपला पाल्य किंवा नातेवाईक जर मुकबधिर, मतिमंद असतील तर त्याचा आजच प्रवेश निश्चित करावा. विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज कार्यालयीन वेळेत दि.१५ जुन पासुन विनामूल्य आहेत. तरी मुकबधीर, मतिमंद या प्रवर्गातील मुलांच्या पालकांनी लवकरात लवकर आपल्या पाल्याचे कागदपत्रे सादर करुन मुलाचा प्रवेश निश्चित करावा व यासाठी प्रत्यक्ष किंवा दुरध्वनी नंबर वर संपर्क साधावा. संपर्क कै भगवानराव ढोबळे मुकबधिर निवासी विद्यालय, मतिमंद निवासी विद्यालय, शासकीय आय.टी.आय.च्या समोर, ताकडगाव रोड गेवराई, दुरध्वनी क्र .७०८३५५५२५५, ९८२३६६९१८२, ९८२२९८२९०२, ९७६३८ ९७४५५, ८६०५४९३३३३, ९६१३५५७७७७, ७०३८०३०२९० येथे संपर्क साधावा अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक व वस्तीगृह अधिक्षक यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

निगडी येथील शिवभूमी विद्यालयातील उपक्रमशिल शिक्षिका

कवयित्री लेखिका श्रीम कोठेकर योगिता संजय महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

दि १५ जून २०२४ रोजी डॉ आंबेडकर भवन मालधक्का येथे आयोजित महाराष्ट्र रत्न पुरस्कार सोहळ्यात राज्यस्तरीय पुरस्काराने विविध क्षेत्रातील मान्यवरांना सन्मानित करण्यात आले यावेळी मुख्य अतिथी.माजी अतिरिक्त आयुक्त श्री. ज्ञानेश्वर मोळक.उपआयुक्त श्री. युनूस पठाण पुणे महानगर पालिका पुणे.ड. सौ. शैलजा ज्ञानेश्वर मोळक वक्ता, लेखिका, संपादिका व प्रकशिका.

अध्यक्ष श्री.विनोद खैरे सिनेआर्क प्रॉडक्शन्स व रूद्रांश फाउंडेशन इ . मान्यवर उपस्थित होते . यांच्या हस्ते महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२४ हा सन्मान निगडी येथील शिवभूमी विद्यालय प्राथ विभागातील उपक्रमशिल ,तंत्रशिक्षिका कवयित्री लेखिका श्रीम. कोठेकर योगिता संजय यांना देण्यात आला . श्रीम कोठेकर योगिता गेले तीस वर्ष निगडी येथील शिवभूमी विद्यालयात कार्यरत असून चांगले बालक घडविण्यासाठी त्यांचे विविध उपक्रम चालू असतात प्रयोग स्पर्धापरीक्षा बाह्यपरिक्षा अशा वेगवेगळ्या तऱ्हेने विद्यार्थ्यांना

नेहमीच प्रोत्साहित करीत असतात तसेच समाज जागृती प्रबोधनाचे कार्यही त्या आपल्या कवितेमार्फत करीत असतात त्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार ही प्राप्त झाले आहेत . वृक्षारोपन, व्यसनमुक्ती, पर्यावरण , परिसर स्वच्छता, गरिब अपंग गरजूंना मदत असे सामाजिक कार्य ही त्या करीत असतात . याच शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र रत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे .असे पुरस्कार सदैव कार्य करण्यास प्रोत्साहन देतात तसेच जबाबदारीचे भान ठेवायला मदत करीत असतात तसेच पुढील वाटचालीसाठी प्रेरित करीत असतात पुरस्कारासाठी सर्व स्तरातून या उपक्रमशील शिक्षिकेचे कौतूक होत आहे .

सरस्वती नदीला पुन्हा पूर

कोथाळा- सिरसाळा गावांचा संपर्क तुटला

गेवराई / प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील अनेक भागात मध्यरात्रीच्या सुमारास दमदार पाऊस झाला. यामुळे परिसरातील नाल्यांना व नदीला पूर आला आहे. दरम्यान कोथाळा येथील सरस्वती नदीला पुन्हा एकदा पूर आला असून कोथाळा- सिरसाळा गावांचा संपर्क तुटला आहे. माजलगाव तालुक्यात मागील आठवड्यात देखील मान्सूनचे जोरदार आगमन झाले होते. यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास पावसाने पुन्हा

एकदा जोरदार पावसाचे आगमन झाले. जोरदार पावसामुळे परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. दरम्यान सरस्वती नदीला पुन्हा पूर आला आहे. यामुळे कोथाळा- सिरसाळा या दोन गावांचा संपर्क तुटला असून ग्रामस्थांचा पुराच्या पाण्यातून जिवघेणा प्रवास करावा लागत आहे.

पिकांच्या वाढीस मदत

दरम्यान पहिला पाऊस झाल्यानंतर शेतकऱ्यांनी खरिपाची पेरणी करून टाकली होती. आता हा पाऊस झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी पेरणी व कापूस लागवड केली असल्याने सोयाबीन, कापूस, मुग, उडीद या पिकाला पावसामुळे चाल येईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

लिंबागणेशकरांनी १८ जुन शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळला ; शेतकरी विरोधी कायदे रद्द करा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ख प्रतिनिधी

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला.२६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्वीकारली गेली.या राज्यघटनेत सर्वांना मुलभूत अधिकार देण्यात आले होते.मात्र अवघ्या दिड वर्षात १८ जुन १९५१ ला निर्वाचित नव्हे तर काळजीवाहू सरकारने पहिली घटना दुरुस्ती खरंतर बिघाड करत घटनेत नसलेले परीशिष्ट ९ जोडण्यात आले.अनुच्छेद ३१ (अ)व (ब) नुसार परीशिष्ट ९ मधील समाविष्ट कायद्यांच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही अशी तरतूद आहे.आज परिशिष्ट ९ मध्ये २८४ कायदे असुन त्यापैकी २५० हुन आधिक कायदे थेट शेतकऱ्यांशी निगडित आहेत.ही घटना दुरुस्ती शेतकऱ्यांना कर्दनकाळ ठरली असुन तिचा परीणाम म्हणून लाखों शेतकऱ्यांना आत्महत्या करावी लागत आहे. हा घटना बिघाड १८ जुन १९५१ रोजी करण्यात आला यांच्या निषेधार्थ किसान पुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांच्या मार्गदर्शनात डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २०१८ पासुन ग्रामस्थांच्या वतीने १८ जुन शेतकरी पारतंत्र्य दिवसपाळण्यात येतो. आज दि.१८

मंगळवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयासमोर दंडाला काळ्या फिती लावून व शेतकरी विरोधी कायद्यांची माहिती ग्रामस्थांना देत शेतकरी पारतंत्र्य दिवस पाळण्यात आला. शेतकऱ्यांसाठी गळफास ठरणारे त्यांच्या आत्महत्यांना कारणीभूत ठरलेले १)कमाल शेतजमीन धारणा(सीलिंग)२) आवश्यक वस्तू कायदा ३) जमीन अधिग्रहण कायदा ३ प्रमुख शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, कृषीमंत्री, विभागीय आयुक्त यांना ईमेल द्वारे करण्यात आली.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, अर्जुन घोलप, विक्रांत वाणी, संतोष भोसले, संतोष वाणी, सय्यद अख्तर,रामदास मुळे, गणेश थोरात, सोनु शिंदे,कचरू निर्मळ आणि पत्रकार हरीओम क्षीरसागर आदि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

देशातील अन्य सर्व नागरिकांना आपल्यावरील अन्यायाच्या विरोधात कोर्टात दाद मागता येते परंतु शेतकऱ्यांना नाही.प्रत्येक उत्पादक आपल्या मालाची किंमत स्वतः ठरवू शकतो परंतु शेतकऱ्यांना आपल्या मालाची किंमत ठरवता येत नाही.कोणाच्या मालमत्तेला कोणीही धक्का लावु शकत नाही.सरकार सुद्धा नाही.पण सरकार शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन ईतर कोणालाही देऊ शकते.आपल्या उत्पादन साधनाचा आकार किती लहान किंवा मोठा असावा,हे ठरविण्याचा अधिकार संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिला आहे परंतु तो आधिकार शेतकऱ्यांना नाही.मग शेतकरी स्वतंत्र कसा?? हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आजही शेतकरी पारतंत्र्यात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT